स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.

'मानव्य' विद्याशाखेअंतर्गत मराठी विषयातील पीएच.डी. (विद्यावाचस्पती)
पदवीसाठी सादर करावयाच्या शोधप्रबंधाचा आराखडा

(Synopsis)

संशोधन विषय

‘‘ ‘अक्षरगाथा’ नियतकालिकाच्या विशेषांकांचा चिकित्सक अभ्यास’’

संशोधक
शरद दत्तराव चापके
एम.ए.मराठी, सेट, नेट
(वसमत)

मार्गदर्शक
प्रा.डॉ.बालासाहेब मुंजाभाऊ काळे
(मराठी विभाग प्रमुख)
(पदवी व पदव्युत्तर)
स्व.रमेश वरपुडकर महाविद्यालय, सोनपेठ, जिल्हा परभणी

ऑगस्ट-२०२३

‘अक्षरगाथा’ नियतकालिकाच्या विशेषांकांचा चिकित्सक अभ्यास

प्रस्तावना :

19 व्या शतकाच्या प्रारंभी महाराष्ट्रात सांस्कृतिक प्रबोधनाची लाट निर्माण झाली. या प्रबोधनाचे एक प्रभावी माध्यम म्हणून नियतकालिकांची सुरुवात झाली. ‘दिग्दर्शन’ (1840) या मासिकाचा पहिला अंक बाहेर पडला आणि बाळशास्त्री जांभेकर यांच्या संपादकत्वाखाली मराठी नियतकालिकाच्या नवयुगाला प्रारंभ झाला.

1850 नंतर महाराष्ट्रात सांस्कृतिक जीवनात जे जे विचारप्रवाह, नवी वैचारिक आंदोलने निर्माण झाली. त्यांचे खंडन-मंडन करण्यात मराठी ‘विविधज्ञानविस्तार’, ‘निबंधमाला’, ‘ज्ञानोदय’ यासारख्या नियतकालिकांनी हातभार लावला. पुढे विसाव्या शतकात ‘किर्लोस्कर’, ‘युगवाणी’, ‘माणूस’, ‘सत्यकथा’, ‘साधना’ व ‘अभिरुची’ यासारख्या नियतकालिकांनी मध्यमवर्गीय समूहाचे मनोरंजन व सामाजिक प्रबोधन करण्याचे काम केले.

आज 21 व्या शतकात देखील इंटरनेट तंत्रज्ञानाचा स्फोट झाला असला तरी ‘परिवर्तनाचा वाटसरू’, ‘कवितारती’, ‘विचारशलाका’, ‘आजचा सुधारक’, ‘मुक्तशब्द’, ‘ऐवजी’, ‘अक्षरगाथा’ यासारख्या नियतकालिकांनी नवलेखकांसाठी व्यासपीठ निर्माण करून दिले आहे.

नियतकालिकाच्या संपादकांनी चालवलेली ‘विशेषांक’ ही संकल्पना मराठी साहित्यात पूर्वीपासूनच लोकप्रिय ठरली आहे. एखाद्या विवक्षित विषयावरील खास अंकाची प्रथा प्रथमत: मासिक ‘मनोरंजनाने’ 1909 पासून सुरू केली. आपल्या जीवनाची किंवा वाङ्मयीन कार्याची मुद्रा उमटविणाऱ्या काही महापुरुषांच्या षष्ट्यब्दी - शताब्दी सारख्या प्रसंगी किंवा दुसऱ्या काही निमित्ताने जे विशेषांक योजनापूर्वक सिद्ध होतात. त्यांना संशोधकांच्या दृष्टीने ग्रंथाची योग्यता प्राप्त होते.

विशेषांकाच्या परंपरेत 'अक्षरगाथा' या नियतकालिकाने मोलाची भर घातलेली आहे. मराठीतील विशेषतः मराठवाड्यातील 2010 साली सुरू झालेल्या या नियतकालिकाने आतापर्यंत 12 संग्राह्य असे विशेषांक प्रसिद्ध केले आहेत. संपादक डॉ.मा.मा. जाधव यांनी विषयाचे वैविध्य राखत दर्जेदार अभ्यासू विचारवंत लेखकांकडून पुरोगामी व परिवर्तनशील विचारांची अभिव्यक्ती या विशेषांकांद्वारे केलेली आहे. त्यामुळे 'अक्षरगाथा' नियतकालिकाच्या विशेषांकांचे मराठी साहित्यात भरीव योगदान दिसून येते.

संशोधनाची गरज :

'साहित्य, कला, संशोधन व परिवर्तनवादी पुरोगामी विचारांशी बांधिलकी ठेवणारे 'त्रैमासिक' असे बोधवाक्य असणारे 'अक्षरगाथा' हे नियतकालिक समकालीनत्व व पुरोगामित्व केंद्रस्थानी ठेवून सामाजिक, राजकीय, आर्थिक, धार्मिक व सांस्कृतिक अशा विविधांगी परिप्रेक्ष्यातून 2010 सालापासून आपल्या विशेषांकांतून मराठीतील वैचारिक साहित्यात भर घालत आहे.

'अक्षरगाथा'चे 12 विशेषांक म्हणजे वाचक, अभ्यासक व संशोधकांच्या दृष्टीने संग्राह्य असे संदर्भग्रंथच बनले आहेत. या विशेषांकांमुळे प्रस्थापित लेखकांपासून ते नव्या पिढीच्या लेखकांना देखील व्यासपीठ मिळाले आहे. थोर महापुरुष, साहित्यिक यांवरील विशेषांक दर्जेदार आहेत. याचबरोबर भाषाविषयक, परिवर्तनवादी, सामाजिक, लोकशाहीवादी या विषयांवरील वैचारिक विशेषांक हे चळवळीतील कार्यकर्त्यांना वैचारिक दृष्टी देणारे आहेत. या विशेषांकांनी वैचारिक साहित्य वाचणारा चोखंदळ वाचकवर्ग निर्माण केला आहे.

महाराष्ट्र आणि त्याबाहेर देखील अनेक महाविद्यालये आणि विद्यापीठांमध्ये हे विशेषांक जात, धर्म, लिंग या मूलभूत संकल्पनेपासून ते जागतिकीकरणापर्यंत सर्वच विषयांना हे विशेषांक कवेत घेतात. केवळ लेखांपुरते मर्यादित न राहता विविध महत्त्वाच्या विषयांवर अधिवेशन, जागर परिषदा व परिसंवाद घेण्याची परंपरा देखील 'अक्षरगाथा' नियतकालिकाने निर्माण केली आहे.

मराठी साहित्यात विशेषांकांची मोठी परंपरा आहे. भरीव असे वाङ्मयीन योगदान देणाऱ्या 'अक्षरगाथा' नियतकालिकाच्या विशेषांकावर स्वतंत्रपणे असे संशोधन यापूर्वी झालेले नाही. त्यामुळे या विशेषांकांचा चिकित्सक अभ्यास करण्यासाठी या विषयाची निवड केलेली आहे.

संशोधनाची उद्दिष्टे :

1) मराठी नियतकालिकाच्या वाटचालीत विशेषांक व त्यांचा प्रवास याचा अभ्यास करणे.
2) मराठी नियतकालिकांपैकी अनेक नियतकालिकांनी महत्त्वाच्या विषयावर विशेषांक प्रसिद्ध केले आहेत. या वाटचालीत समकालात प्रसिद्ध होणारे 'अक्षरगाथा' नियताकालिकांच्या विशेषांकांचे वैचारिक योगदान स्पष्ट करणे.
3) 'अक्षरगाथा' नियतकालिकाने प्रसिद्ध केलेल्या विशेषांकाचा चिकित्सक अभ्यास करणे.
4) 'अक्षरगाथा' नियतकालिकाच्या विशेषांकांची वैविध्यपूर्ण मांडणी व आशयाचा अभ्यास करून, ते वैचारिकतेला व चळवळीला कसे प्रोत्साहित करते याची चिकित्सा करणे.

संशोधनाची गृहितके :

1) मराठी नियतकालिकाच्या वाटचालीतील विशेषांकांची कामगिरी महत्त्वपूर्ण आहे.
2) 'अक्षरगाथा' या नियतकालिकाच्या विशेषांकांचे मराठीतील वैचारिक साहित्याला मोलाचे योगदान आहे.
3) 'अक्षरगाथा' नियतकालिकाच्या विशेषांकांमध्ये विषयाची व आशयाची वैविध्यता आढळून येते.
4) 'अक्षरगाथा' या नियतकालिकाच्या विशेषांकांतून वैचारिकतेला व चळवळीला प्रोत्साहन मिळत आहे.

संशोधनपूर्व साहित्याचा आढावा आणि कार्यक्षेत्र :

"'अक्षरगाथा' नियतकालिकाच्या विशेषांकांचा चिकित्सक अभ्यास" या विषयावरील संशोधनासाठी 2010 ते 2023 या कालावधीतील 12 विशेषांकांना आधारभूत मानण्यात येईल. मराठी नियतकालिके व त्यांचे विशेषांक यावरील प्रकाशित संदर्भ साहित्य, संशोधनपूर्व काळातील संशोधने तसेच अन्य संदर्भग्रंथाचा आधार घेण्यात येईल.

संशोधन पद्धती :

प्रस्तुत विषयांवरील संशोधनासाठी वर्णनात्मक, विश्लेषणात्मक संशोधन पद्धतींचा अवलंब करण्यात येईल.

॥ प्रकरण योजना ॥

प्रकरण पहिले : **प्रस्तावना**

या प्रकरणात नियतलिकांची पार्श्वभुमी आणि त्यांच्या विशेषांकांचा आढावा घेण्यात येईल. 'अक्षरगाथा' नियतकालिकाच्या विशेषांकांचे आशयानुसार वर्गीकरण तसेच विशेषांकांमागील प्रेरणा अभ्यासून वेगळेपण आणि महत्व मांडण्यात येईल.

प्रकरण दुसरे : **'अक्षरगाथा'नियतकालिकातील चरित्रपर विशेषांक**

'अक्षरगाथाने' आजवर प्रकाशित केलेल्या विशेषांकांपैकी दोन विशेषांक चरित्रपर संकल्पनेत मोडतात. कुळवाडीभूषण छत्रपती शिवराय यांच्यावरील विशेषांकांतून शिवरायांच्या कृतीतून आणि जीवनातून प्रकट झालेली वैचारिकता, निधर्मीपणा व समाजक्रांतीपर विचार यांचा आढावा घेण्यात येईल. डॉ.आ.ह. साळुंखे विशेषांकातून पुरोगामी व प्रागतिक विचाराचा परामर्श घेतला जाईल. जाणकार, साक्षेपी लेखकांनी लिहिलेल्या लेखांची चिकित्सा या प्रकरणात केली जाईल.

प्रकरण तिसरे : **'अक्षरगाथा'नियतकालिकातील सामाजिक विषयावरील विशेषांक**

सामाजिक विशेषांक या विषयावरील विशेषांकातील लेखांमधून समता, बंधुता, स्वातंत्र्य या लोकशाही मूल्यांचा अभ्यास करता येईल. समकालीन समाज आणि माध्यमे, भारतीय संविधान व त्यापुढील आव्हाने यांचा विश्लेषणात्मक पद्धतीने अभ्यास करण्यात येईल. तसेच सामाजिक मूल्यांच्या जोपासणीसाठी तज्ञांच्या लेखणीतून शोधण्यात आलेले तत्वे यांचा आढावा घेण्यात येईल.

प्रकरण चौथे : **‘अक्षरगाथा’नियतकालिकातील भाषा व साहित्य विषयक विशेषांकांची चिकित्सा करणे.**

तज्ञ मार्गदर्शकांनी सद्यस्थितीतील मराठी भाषा व मराठी साहित्य तसेच शाळा महाविद्यालयामध्ये शिकवला जाणारा मराठी भाषाभ्यासक्रम याचा लेखा-जोखा मांडला आहे. मराठी कादंबरी विशेषांकातून कादंबरी लेखनाविषयीच्या इ. साधक-बाधक चर्चा संशोधकांना मार्गदर्शक ठराव्यात अशा आहेत. या सर्व चर्चेचा आढावा व चिकित्सा या प्रकरणात करण्यात येईल.

प्रकरण पाचवे : **परिवर्तनवादी विचारांचे विशेषांक**

समकालीन समाजातील ज्वलंत परिवर्तनवादी चळवळी जसे की स्त्रीवादी चळवळ, LGBT चळवळ, भटक्या- विमुक्तांची चळवळ, कामगारांची चळवळ, शेतकरी वर्गांची चळवळ यांच्यावरील अभ्यासू लेखांचा चिकित्सक आढावा घेण्यात येईल. आजच्या काळातील सांस्कृतिक दहशतवाद, धार्मिक मूलतत्त्ववाद, जातीय व पितृसत्ताक मानसिकता यांचाही आढावा विविध लेखांद्वारे घेण्यात येईल.

प्रकरण सहावे : **निष्कर्ष आणि उपसंहार**

प्रस्तुत प्रकरणामध्ये मागील प्रकरणांचा आढावा घेऊन अक्षरगाथा नियतकालिकाच्या विशेषांकाच्या विविधांगी विषयातून वैचारिक लेखनाला मिळालेली प्रेरणा, वैचारिक चळवळीला मिळालेली चालना अभ्यासायची आहे. तसेच प्रत्येक प्रकरणातून हाती आलेले निष्कर्ष प्रस्तुत प्रकरणात समाविष्ट केले जातील.

परिशिष्ट :

१) ‘अक्षरगाथा’ नियतकालिकाचे २०१० पासून ते २०२३ पर्यंतचे विशेषांक

२) संदर्भ ग्रंथसूची

I. मराठी नियकालिकांचा इतिहास (१८३२-१९३७), रा.गो.कानडे, कर्नाटक पब्लिशिंग हाऊस, मुंबई

II. मराठी मासिकांचे पहिले शतक - बा.द. सातोस्कर, शुभदा – सारस्वत पब्लिकेशनस

III. मराठी नियकालिकांचा वाङ्मयीन अभ्यास खंड १ – संपादक व.दि. कुलकर्णी, श्रीविद्या प्रकाशन

IV. मराठी नियकालिकांची सूची (१८००-१९५०) प्रथम खंड, शं.गो.दाते व सहकारी

३) लेखसूची

संशोधक
शरद दत्तराव चापके
एम.ए.मराठी, सेट, नेट
(वसमत)

मार्गदर्शक
प्रा.डॉ.बालासाहेब मुंजाभाऊ काळे
(मराठी विभाग प्रमुख)
(पदवी व पदव्युत्तर)
स्व.रमेश वरपुडकर महाविद्यालय,
सोनपेठ, जिल्हा परभणी